ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद, वाशिम

वाचा :- १) कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन पापु व स्वच्छता विभाग यांचे प्रज क्र.डेटाआ २०१०/प्र.क्र११/पापु २५ दि ०६/०९/२०१०

२) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण -२०१२/प्रक्र७२/पापु ०७ मंत्रालय मुंबई , दि.१ नोव्हेंबर २०१२

३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, वाशिम यांचे नियुक्ती आदेश क्र १७५७/१९ दि. २२/८/२०१९

जा.क्र./जिपवा/ग्रापापु/आस्था/२६५/२०२०
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प. वाशिम
दि. २ /०३/२०२०

**आदेश:**

उपरोक्त संदर्भीय आदेश क्र .३ अन्वये आपली ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद, वाशिम अंतर्गत ६ महीण्याच्या करार तत्वावर नियुक्ती देण्यात आली होती. आपला ६ महीण्याचा करार कालावधी दि. ६/३/२०२० रोजी संपुष्टात आल्याने खालील कर्मचारी यांना या आदेशान्वये दि. ७/३/२०२० ला १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन त्यांचे कामकाज समाधानकारक असल्यामुळे याद्वारे पुढील ११ महीण्याकरिता माहे ऑक्टोबर २०२० पासुन ८% मानधन वाढीसह संदर्भीय शासन निर्णय क्र २ चे जोडपत्र ३ मधील अटी शर्तीचे अधिन राहुन मुदतवाढ देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव व पत्ता | नेमणुकीचे ठिकाण | पदाचे नाव | नेमणुकीचा कालावधी | | मानधन वाढ | एकुण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासुन | पर्यंत | | |
| १ | श्री. कळणु भगवान शिंदे मु. पो. कळंबेश्वर, ता. मालेगाव जि. वाशिम | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद वाशिम | डाटा ऐन्ट्री ऑपरेटर | ८/३/२०२० | ७/२ /२०२१ | ८% | १०८०० +८०० माहे ऑक्टो-२० पासुन |

**ही नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपाची असुन खालील अटी व शर्तीच्या अधिन राहील.**

१)करार कालावधी संपुष्टात आल्या नंतर डाटा ऐन्ट्री ऑपरेटर या पदावरील नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

२)आपले काम समाधानकारक असल्यास व कार्यालयास आवश्यकता वाटल्यास पुन्हा नियुक्ती बाबतचे सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वाशिम यांचे कडे राखुन ठेवण्यात आले आहे.

३)आपली नियुक्ती संपुष्टात आल्या नंतर किंवा कोणत्याही कारणाने रद्द केल्यास पुन्हा नियुक्ती बाबत आपणास कोर्टात जाता येणार नाही किंवा कोणतेही अपिल करता येणार नाही.

४)सदर पद हे तात्पुरत्या स्वरुपाचे असुन या पदावर कायम करणे बाबत आपणास कोणत्याही प्रकारची अपिल करता येणार नाही.

५)डाटा ऐन्ट्री ऑपरेटर या पदावर आपणांस रुपये १०८००/- मानधन देण्यात येईल या व्यतिरिक्त कोणतेही लाभ आपणास देय राहणार नाहीत.तसेच शासनाकडुन प्राप्त सुचना व शासन निर्णय आपणास संपुर्णपणे बंधनकारक राहील.

६)संबधितास हे आदेश मिळाल्याचे दिनांकापासुन १५ दिवसाचे आत नियुक्तीचे ठिकाणी रुजु व्हावे लागेल व उल्लेखीत कालावधीत रुजु न झाल्यास नेमणुक रद्द केली जाईल मात्र अपवादात्मक परिस्थितीत हा कालावधी वाढवता येईल.त्या करीता संबंधीतास या कार्यालयाची परवानगी घ्यावी लागेल.

७)या पदावर नेमणुक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असुन सदर सेवा कोणतेही कारण न दर्शविता समाप्त करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वाशिम यांचे कडे राखुन ठेवण्यात येत आहे.

८)कामावर रुज होते वेळेस अटी व शर्ती बाबत रु.१००/- चे मुद्रांकावर अटी मान्य असल्याबाबत करारपत्र सादर करावे लागेल. पुर्ननियुक्ती मिळाल्यास अटी व शर्ती बाबत पुन्हा रुपये १००/- चे मुद्रांकावर करारपत्र सादर करावे लागेल.

९)ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील संगणक विषयक सर्व कामे व तसेच वरिष्ठांनी सांगीतलेली कामे करावे लागेल. — स्वा -

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, वाशिम

प्रतिलिपी :-१)मा. संचालक पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था प्रकल्प व्यवस्थापन कक्ष सिडको भवन (दक्षिण कक्ष),१ला मजला सी.बी.डी.नवी मुंबई बेलापुर,यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

२)उप मुख्यकार्यकारी अधिकारी (सा) जिल्हा परिषद वाशिम यांना माहितीकरीता रवाना.

३)मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांना माहीतीकरीता.

४) श्री. कळणु भगवान शिंदे मु. पो. कळंबेश्वर, ता. मालेगाव जि.वाशिम यांना माहिती करीता तसेच आपण हे आदेश प्राप्त होताच नियुक्तीचे ठिकाणी कामावर तात्काळ रुजु व्हावे. करिता माहीतीस्तव रवाना.

२८/०२/२०

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, वाशिम

Scanned with CamScanner